महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२२-२३/संस्थास्तर प्रवेश/ 3149

दिनांक : १९/०७/२०२३

20 JUL 2023

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एमबीए आणि अभियांत्रिकीसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश करतांना नियमांचे पालन करण्याबाबत..**

**संदर्भ :-** १) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.१२२३/प्र.क्र.०७/केंप्रप्र/२०२३/ १४६८ दि.१०.०७.२०१३

२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई याचे पत्र क्र.२अ/एडीएम/संस्थास्तर प्रवेश/२०२२/२१३ दि.१९.०७.२०२३

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे मराठा विकास संघटना यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवरील प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकांमधील मुद्दा क्रमांक १३ (पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ आणि पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्रमांक ३५) अन्वये नियम / सुचनांचे तंतोतंत पालन करुन प्रवेश प्रक्रिया राबवावी असे संदर्भाधीन पत्रान्वये कळविलेले आहे.

या अनुषंगाने सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक तंशिप्र-१२२३/प्र.क्र.०७/सीईटी/२०२३/१३५१ दिनांक २७.०६.२०२३ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. आपल्या संस्थेच्या संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर उपरोक्त तरतूदींनुसारच प्रवेश प्रक्रिया करावी.

( डॉ.द.व्यं.जाधव )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/संस्थास्तर प्रवेश/ २०२३/293 दिनांक 19 JUL 2023

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एमबीए आणि अभियांत्रिकीसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश करताना नियमांचे पालन करण्याबाबत...**

संदर्भ : **मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक १२२३/ प्र.क्र.०७/ केंप्रप्र/ २०२३/ १४६८, दिनांक १०.७.२०२३**

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचेकडे मराठा विकास संघटना यांनी दिलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवरील प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकांमधील मुद्दा क्रमांक १३ (पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्रमांक २६ आणि पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्रमांक ३५) अन्वये नियम/ सुचनांचे तंतोतंत पालन करुन प्रवेश प्रक्रिया राबवावी असे संदर्भाधीन पत्रान्वये कळविलेले आहे.

याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, **राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक तंशिप्र-१२२३/प्र.क्र.०७/सीईटी/२०२३/१३५१,दिनांक २७.६.२०२३ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.** आपल्या संस्थेच्या संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर उपरोक्त तरतूदींनुसारच प्रवेश प्रक्रिया करावी.

( डॉ.विनोद मोहितकर )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना माहितीस्तव व सदर परिपत्रकास आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी ----

१) सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपूर त्यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणावे व या बाबतची अंमलबजावणी काटेकोटपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

२) माहिती तंत्रज्ञान कक्ष(कार्यासन क्रमांक ३) मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्र शासन

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२३/प्र.क्र.०७/सीईटी/२०२३/१३५१ दिनांक-२७/०६/२०२३.

## महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातंर्गत असलेल्या तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रवेश प्रक्रियेची तीसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा व संस्थास्तरावरील जागांच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकामधील मुद्या क्रमांक १३ (पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्र. २६ व पदवी माहिती पुस्तिका २०२३-२४ पृष्ठ क्र. ३५ ) अन्वये नियम/सुचनांचे तंतोतंत पालन करुन संस्थेने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

वरील परिच्छेदेमध्ये नमूद केलेले पदवी व पदव्युत्तर पदवी प्रवेश प्रक्रियेच्या माहिती पुस्तिकेमधील मुद्या क्रमांक १३ अन्वये नियम / सूचनांचे पालन करणार नाही, अशा महाविद्यालयांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच प्रवेश प्रक्रिया राबविताना सर्व प्रवेश गुणवत्ता क्रमांकानुसारच देण्यात यावेत व विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जांची यादी व त्यांची अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) संस्थेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात यावी आणि सीईटी कक्षाच्या माहितीकरीता सदरील यादी ई-मेलद्वारे पाठवावी.

सही/-

**(महेन्द्र ब. वारभुवन, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**